
103

ISSN 2394-5303

# Printing® Area

Issue-64, Vol-02 April-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor

Dr.Bapu G.Gholap

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**
**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**
289/55, Vasanthapuram,
ICMC, Chinna Thirupathy Post,
Salem- 636008 +919655554464
davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**
Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**
A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**
Associate Professor,Department of Marathi
Banaras Hindu University,
Varanasi-221005.(Uttar Pradesh)
Mobi. 9450533466
pbpadwal@gmail.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.387(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | April 2020 Issue-64, Vol-02 | 010

# INDEX


01) To Improve English Language Communication Skills among The Rural ...
Dr. Shrinivas S. Gadhe, Nanded ||14

02) Tourism & Career opportunity
Prof.Dr. Kailas Baban Ingle, Buldhana ||17

03) Poona Pact And Its Impact On Bahujan Movement In Dr. Ambedkar ...
Dr. Shailesh Raut, Aurangabad ||20

04) A species of *Xylaria* from Melghat forest
P. S. Kaste, Amravati ||23

05) Role Of Psychological And Social Factors In Understanding Criminal ...
Jyoti Jaiswal, Bhagalpur ||24

06) Independence, Constitution and tribal Politics, Politics of Sixth ...
Dr. Tapan Chandra Kalita, Mr. Mantu Ramchiary, Nikashi ||27

07) Role of Education in Women Empowerment and Development
Dr. Ritu Bhardwaj, Ritu Sakhuja, Gajraula ||34

08) A Study On Issues And Challenges Of Women Entrepreneurs In India
Siddaraju S., Mysuru ||36

09) Empowerment Of Rural Women Folk In Agomani Development Block ...
Dr. Manoranjan Roy, Dhubri ||42

10) A study of Poverty and Rural Development in Rural Athani taluka of ...
Mr. Raghavendra P. Salve, Dr. G. K. Boodeppa, Belagavi ||48

11) Service Delivery- Performance Measurement of Basic Civic Services ...
Hardeep Singh, Chandigarh ||53

12) Ultrasonic Velocities of Binary Liquid Mixtures using Scaled Particle ...
Dr. K. N. Pande, Akola ||62

13) वृध्दांचे संगोपन : आधुनिक काळातील एक अपरिहार्यता
प्रा. कामराज आर. रामटेके, भंडारा ||65


www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

14) पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास
**प्रा. उज्वला बाजपाई, अकोला** ||67

15) जयवंतराव सावंत वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थी व ...
**अमृता शिंदे, बारामती** ||70

16) दलित साहित्याचा क्रान्तीकारी प्रवास
**प्रा.डॉ. लता रा. जावळे, वाशिम** ||73

17) नामदेव ढसाळ यांच्या काव्यातील आशय आणि विद्रोह
**प्रा.डॉ. अविनाश कृष्णराव मेश्राम, बुलडाणा** ||76

18) उच्च शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाची (युजीसी) भूमिका आणि शैक्षणिक विकास ...
**प्रा.डॉ. विजयसिंग आय. गिरासे, नंदुरबार** ||80

19) विदर्भाचे नंदनवन, चिखलदरा येथे पर्यटकांना येणाऱ्या समस्याचे अध्ययन
**डॉ. एच. यु. पेटकर, अमरावती** ||85

20) महाराष्ट्रात प्रधानमंत्री मुद्रा योजना —एक अध्ययन
**डॉ. प्रकाश बाबुराव तितरे, चंद्रपूर** ||89

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता
**रमेश पवार** ||93

22) स्पंदन: एक आकलन
**प्रा.डॉ. चंद्रकांत दशरथ रुद्राक्षे, अहमदनगर** ||96

23) कादंबरीची वाचनप्रकिया
**प्रा.डॉ. राजेंद्र वडमारे, अहमदनगर** ||99

24) आधुनिक शिक्षा में नवाचार व्यवस्था
**सुमन भैरवाल, जयपुर** ||110

25) ललमनियाँ कहानी में प्रतिबिंबित लोक संस्कृति
**प्रा.डॉ. राजश्री भामरे, लातूर** ||112

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

टक्के उत्तरदात्यांनी स्पष्ट केले आहे. १४.९१ टक्के उत्तरदात्यांनी ... झाली नाही. असे मत नोंदविलेले आहे. तर ०१.४१ टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असा कल दिल्याचे स्पष्ट होते.

• विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची भौतिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. ... सरासरी ८३.२० टक्के उत्तरदात्यांनी स्पष्ट केले आहे. १४.७२ टक्के उत्तरदात्यांनी प्रगती झाली नाही. असे मत नोंदविले आहे. तर ...०८ टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असा कल दिल्याचे स्पष्ट ...

संदर्भ -


१. प्रा.डॉ. विजयसिंग आय. गिरासे., उच्च शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) योजनांचा परिणाम, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर - २०१९

२. प्रा.सुधाकर माणकर, यु.जी.सी. हॅण्डबुक, अतुल प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३. प्रा.डॉ.विजयसिंग आय.गिरासे., विद्यापीठ अनुदान आयोग आणि उच्च शिक्षण, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर - ...

४.नटराजन आर., उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह.

५. www.ugc.ac.in

६. www.nmu.ac.in

७. www.nandurbar.nic.in

८. www.mhrd.gov.in


□□□

**19**

# विदर्भाचे नंदनवन, चिखलदरा येथे पर्यटकांना येणाऱ्या समस्याचे अध्ययन


**डॉ. एच. यु. पेटकर**

सहयोगी प्राध्यापक, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती


आज संपूर्ण जगामध्ये पर्यटनाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. मोठ मोठ्या नगरांमध्ये व्यक्ती काम करीत आहे त्यामुळे तो जीवनातील आनंद व शांतता हरवून बसला आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याला आनंद व शांतता मिळावयाची असे तर तो पर्यटनाला मित्रांसोबत / कुटुंबासोबत बाहेर पडत असतो.

आज पर्यटन ही आपल्या जीवनाची गरज बनली आहे. आपल्या जीवनातील आनंदाचा व सुखाचा क्षण बनला आहे. व्यक्तीला सवड मिळेल त्यावेळेस तो आपल्या आर्थिक कुवतीप्रमाणे नियोजन करुन पर्यटनाकरिता घराबाहेर पडतो व पर्यटनाचा आनंद घेतो. पर्यटनामुळे लोकांना क्षणिक आनंद मिळत असला तरी दीर्घकालीन आठवणीमध्ये असलेला तो एक क्षण असतो.

मेळघाटमधील 'चिखलदरा' हे विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखले जाते. ते एक प्रासिध्द थंड हवेचे ठिकाण आहे. हैद्राबाद फलटणीचा इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबिनसन्स यांनी १८२३ मध्ये चिखलदऱ्याचा शोध लावला. हे ठिकाण थंड हवेमुळे त्यांना फार आवडले त्यामुळे इंग्रजांनी चिखलदऱ्याला विकसित करण्याचे ठरविले. १८५० च्या सुमारास येथे प्लेटो फंडची स्थापना करण्यात आली. मध्यप्रांत व बेरार राज्य असताना दिनांक ०१/०८/१९४८ ला नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली. चिखलदरा नगरपरिषदेच्या दोन पातळ्या निर्माण करुन अप्पर प्लेटो व लोअर प्लेटोची निर्मिती केली. अलिकडे चिखलदरा येथील जास्तीत जास्त तापमान ३५-३८ डिग्री तर कमीत कमी तापमान ७.५ डिग्रीपर्यंत येत असते. वार्षिक सरासरी पाऊस १८०० ते २००० सेमी. एवढा पडतो. चिखलदरा हे महाराष्ट्रामध्ये कॉफीचे मळे असणारे एकमेव ठिकाण आहे. या भागात अलिकडे स्ट्राबेरी सुध्दा घेण्यात यते. शुध्द व थंड हवा असलेले हे एक ठिकाण आहे. ३०-४० किलोमिटरच्या परिघात प्रेक्षणिय व निसर्गरम्य दहा-बारा पॉईंट आहेत. मोठ्या प्रमाणावर जैवविविधता आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प सुध्दा आहे. चिखलदऱ्याला निसर्गाने भरभरुन सौंदर्य दिलेले आहे.

विदर्भामध्ये एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेले चिखलदरा हे दऱ्याखोऱ्यांनी व निसर्गानी नटलेले आहे. त्यामुळे दरवर्षी लाखो पर्यटक चिखलदऱ्याला भेटी देत असतात. फक्त विदर्भातील पर्यटक नाही तर मराठवाडा, खान्देश मधील पर्यटक मोठ्या प्रमाणात चिखलदऱ्याला येतात. एवढेच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र, मध्यप्रदेश व भारतातील पर्यटक सुध्दा चिखलदऱ्याला भेटी देतात. त्यामुळे चिखलदऱ्याचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. अलिकडेच भारतातील पहिले व आशिया खंडातील सर्वात मोठ्या स्कॉयवॉकच्या प्रकल्पाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतील अशी अपेक्षा आहे. चिखलदऱ्यामध्ये पर्यटकांना येणाऱ्या समस्यांचे योग्य पध्दतीने निराकरण केल्यास एक आदर्श पर्यटनस्थळ म्हणून उदयास येईल.

**पर्यटनाच्या व्याख्या :**

१९७६ the tourism society of England, "Tourism is the temporary short term movement of people to destination outside the place were they normally live and wone their activities"

In १९८१, The international Association of Scientists and experts in tourism defined, "Tourism is term of particular activities selected by choice and undertaken side the home"

In १९८४ the united states national indentifies there forms of Tourism

१. Domestic Tourism

२. Inbound Tourism

३. Out Bound Tourism

**अध्ययन पध्दती :**

अध्ययनकर्ता हा मागील विस वर्षापासून चिखलदरा येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. तो पदवी परीक्षेला समाजशास्त्र हा विषय शिकवितो. चिखलदरा हे विदर्भातील नंदनवन म्हणून ओळखल्या जाते. चिखलदरा नगर परिषदेच्या रेकॉर्डनुसार साधारणत: प्रत्येक वर्षी अडीच ते तीन लाख पर्यटक भेट देतात. अनेक पॉईंटवर चौकांमध्ये, हॉटेल्समध्ये संशोधकाने पर्यटकांसोबत केलेल्या चर्चेवरुन चिखलदरा पर्यटनस्थळी येणाऱ्या समस्या त्यांच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकायला मिळाल्या त्यामुळेच संशोधकाने चिखलदरा येथे पर्यटकांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन हा विषय संशोधनाकरिता निवडला.

**अध्ययनाचे उद्देश :**

१. चिखलदरा पर्यटनस्थळी असणाऱ्या निवासाची व खानपाणाच्या सुविधांचा अभ्यास करणे.

२. दळणवळणाच्या सुविधांचा अभ्यास करणे.

३. पर्यटकांकरिता असणाऱ्या विविध सुविधांचा अभ्यास करणे.

**नमुना निवड व अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययन हे प्राथमिक व दुय्यम तथ्यावर आधारीत असून चिखलदरा पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या मुलाखती व प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राथमिक तथ्य गोळा करण्यात आली व पर्यटनाशी तसेच चिखलदऱ्याशी संबंधित साहित्याचे परीक्षण करुन विषयाची मांडणी करण्यात आली. याकरिता असंभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील सोईस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. तथ्य संकलनाकरिता मुलाखत पध्दती, प्रश्नावली व निरीक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. दरवर्षी अडीच ते तीन लाख पर्यट[illegible] चिखलदरा पर्यटन स्थळाला भेट देत असतात. त्यापैकी जुलै-ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये एका लाखापेक्षा अधिक लोक भेट देतात. संशोधकाने मागील जुलै २०१८ मध्ये भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेऊन जुलै २०१९ मध्ये ज्या पर्यटकांनी चिखलदरा पर्यटन स्थळाला भेट दिली त्यापैकी ८०० पर्यटकांच्या मुलाखती व प्रश्नावली ह्या पर्यटक मार्गदर्शकाच्या मदतीने घेण्यात आल्या. मिळालेल्या माहितीच्या आधारावर विश्लेषण करुन निष्कर्ष मांडण्यात आले. निघालेल्या निष्कर्षाचा विचार करुन काही सूचना करण्यात आल्या.

**सारणी क्र. १**

(बहुप्रतिसादी सारणी, पर्यटक स्त्री-पुरुष ८००)

| अ. क्र. | पर्यटकांचे मत | पूर्णपणे समाधानी | काही प्रमाणात समाधानी | समाधानी नाही |
|---|---|---|---|---|
| १ | राहण्याच्या सुविधेविषयी | १४४ (१८.००) | ४०० (५०.००) | २५६ (३२.००) |
| २ | खानपाणाच्या सुविधेविषयी | २०८ (२६.००) | १४४ (१८.००) | ४४[illegible] (५६.००) |
| ३ | प्रत्येक पॉईंटवर जाणाऱ्या रस्त्याविषयी | ६४ (०८.००) | १७६ (२२.००) | ५६० (७०.००) |
| ४ | चिखलदरा पर्यटक मार्गदर्शकाविषयी | ३६० (४५.००) | ३२० (४०.००) | १२० (१५.००) |
| ५ | पर्यटन करताना सुरक्षिततेविषयी | ६१६ (७७.००) | १२० (१५.००) | ६४ (०८.००) |
| ६ | चिखलदरा स्थळाला भेटीविषयी | २४० (३०.००) | ३३६ (४२.००) | २२४ (२८.००) |

वरील सारणीवरुन आपल्या असे निदर्शनास येते की, एकूण ८०० पर्यटकांची विविध प्रश्नांवर मते जाणून घेतली असता राहण्याच्या सुविधेविषयी काही प्रमाणात समाधानी असणाऱ्या पर्यटकांची संख्या ही अधिकांश म्हणजे ४०० (५०.००%) आहे. समाधानी नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या ही २५६ (३२.००%) आहे तर पूर्णपणे

समाधानी नाही अशी मते व्यक्त करणाऱ्या पर्यटकांची संख्या ही अत्यल्प म्हणजे १४४ (१८.००%) आहे. यामध्ये ज्या पर्यटकांनी काही प्रमाणात समाधानी आहो अशी प्रतिक्रिया नोंदविली त्यांच्या मते ज्याप्रमाणे हॉटेल्सच्या खोलीचे भाडे आकारले जाते त्याप्रमाणात सुविधा मिळत नाही. उदा. पाणी, केबल रुम सुविधा इत्यादी. तर ज्यांनी समाधानी नाही अशा प्रतिक्रिया व्यक्त केली त्यांच्या मते ज्याप्रमाणात हॉटेल्सच्या खोलीचे भाडे आकारण्यात येते त्याप्रमाणात खोलीमध्ये सुविधा उपलब्ध नसतात अशी प्रतिक्रिया व्यक्त केली उदा. पाणी टि. व्ही. चॅनल्स, रुम सुविधा इत्यादी.

खानपानाच्या समाधानाविषयी पर्यटकांना विचारले असता, खानपाणाविषयी समाधानी नाही अशी प्रतिक्रिया अधिकांश म्हणजे ४४८ (५६.००%) पर्यटकांनी व्यक्त केली. खानपानाविषयी पूर्णपणे समाधानी आहेत अशी प्रतिक्रिया २०८ (२६.००%) पर्यटकांनी व्यक्त केली तर १४४ (१८.००%) पर्यटकांनी खानपानाविषयी काही प्रमाणात समाधानी आहे अशी प्रतिक्रिया दिली. यावरुन असे निदर्शनास येते की, खान-पानाच्या सुविधेविषयी अधिकांश पर्यटक हे समाधानी आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, खान-पानाच्या किंमती फार जास्त आहे. फारच महाग आहे, आवश्यक असणारे पदार्थ मिळत नाही उदा. इडली, दोसा, वडापाव, मटन, फिश इत्यादी खानपानाविषयी समाधान व्यक्त करणाऱ्यांनी त्यांना आवश्यक असणाऱ्या पदार्थाची चव सुंदर होती अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

चिखलदरा पर्यटन स्थळी पोहचल्यानंतर प्रत्येक पॉईंटवर जाणाऱ्या रस्त्याविषयी पर्यटकांची मते जाणून घेतली असता ५६० (७०.००%) पर्यटकांनी रस्ते खुपच खराब झाले आहे त्यामुळे जीव मुठीत धरुन जावे लागते त्यामुळे आम्ही रस्त्याविषयी समाधानी नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. १७६ (२२.००%) पर्यटक काही प्रमाणात समाधानी आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यांची मते अधिक जाणून घेतली असता काही रस्ते फारच खराब आहे त्यामुळे आम्ही पूर्णपणे समाधानी नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली तर फक्त ६४ (०८.००%) पर्यटकांनीच पूर्णपणे समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया नोंदविली. पूर्णपणे समाधानी असणाऱ्या पर्यटकांपैकी अधिकांश पर्यटकांनी संपूर्ण पॉईंटला भेट दिलेली नव्हती अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

चिखलदरा पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांना पर्यटन मार्गदर्शक (Toruiest Guide) संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना ३६० (४५.००%) पर्यटकांनी आम्ही समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. ३२० (४०.००%) पर्यटकांनी काही प्रमाणात समाधानी आहोत अशी मते नोंदविली तर १२० (१५.००%) पर्यटकांनी समाधानी नाही अशी प्रतिक्रिया नोंदविली. यावरुन आपणास असे लक्षात येते की, चिखलदरा पर्यटनस्थळाला भेट दिल्यानंतर पर्यटन मार्गदर्शक हे फार चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करतात असे अधिकांश ३६० (४५.००%) पर्यटकांना वाटते तर (१५.००%) पर्यटकांनी पर्यटक मार्गदर्शक खुप जास्त पैसे घेतात त्यामुळे आम्ही समाधानी नाही अशी प्रतिक्रिया नोंदविली.

चिखलदरा येथे पर्यटन करताना सुरक्षिततेविषयी अधिकांश म्हणजे ६१६ (७७.००%) पर्यटकांनी पूर्णपणे समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. १२० (१५.००%) पर्यटकांनी काही प्रमाणात सुरक्षित आहोत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली तर ६४ (०८.००%) पर्यटकांनी पर्यटन करताना सुरक्षिततेबाबत आम्ही समाधानी नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यावरुन असे निदर्शनास येते की, चिखलदरा येथे पर्यटनाकरिता सुरक्षिततेबाबत ६१६ (७७.००%) पर्यटक समाधानी आहेत तर जे ६४ (०८.००%) पर्यटक समाधानी नाहीत त्यांनी माकडांपासून त्रास होतो तसेच प्रत्येक पॉईंटवर कमीत कमी एकतरी पोलीस असावयास पाहिजे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. चिखलदरा पर्यटन स्थळाला भेट देऊन ३३६ (४२.००%) पर्यटक काही प्रमाणात समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात. पूर्णपणे समाधानी आहोत असे २४० (३०.००%) पर्यटकांना वाटते तर २२४ (२८.००%) पर्यटक हे समाधानी नाही अशी मते व्यक्त करतात.

यावरुन असे निदर्शनास येते की, अधिकांश पर्यटक म्हणजे ३३६ (४२.००%) काही प्रमाणात तर २४० (३०.००%) पर्यटक हे पूर्णपणे समाधानी आहेत. याचाच अर्थ चिखलदरा पर्यटनाला चालना देण्याकरिता पुरक व चांगले वातावरण आहे. फक्त २२४ (२८.००%) पर्यटक हे चिखलदऱ्याला भेट देऊन समाधानी नाही. यांच्या मते या पर्यटन स्थळावर नैसगिक साधनसंपत्ती / देखावे भरपूर आहेत परंतु ते योग्य पध्दतीने विकसित केल्या गेले नाही. पॉईंटवरती कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत त्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही.

**सारणी क्र. २**

(बहुप्रतिसादी सारणी, पर्यटक ८००)

| अ. क्र. | पर्यटकांचे मत | पूर्णपणे समाधानी | काही प्रमाणात समाधानी | समाधानी नाही |
|---|---|---|---|---|
| १ | राहण्याची | २९२ (३६.५०) | १३० (१६.२५) | ३७८ (४७.२५) |
| २ | नास्ता व जेवणाची | २२३ (२७.८७) | २५५ (३१.८७) | ३२२ (७०.२५) |
| ३ | मार्गदर्शकाची | ४५ (०५.७०) | ६६३ (८२.८०) | ९२ (११.५०) |
| ४ | रस्त्याची / वाहतुकीची | ४१२ (५१.५०) | ११० (१३.७५) | २७८ (३४.७५) |
| ५ | बँक, एटीएम सुविधा | ४०८ (५१.००) | १४४ (१८.००) | २४८ (३१.००) |
| ६ | दवाखाना | ३९७ (४९.६३) | १७९ (२२.३७) | २२४ (२८.००) |

वरील बहुप्रतिसादी सारणीवरुन आपल्या असे निदर्शनास येते की, चिखलदरा येथे जुलै २०१९ मध्ये येणाऱ्या ८०० पर्यटकांची समस्या संदर्भात मते जाणून घेतली असता राहण्याची समस्या ३७८ (४७.२५%) लोकांना काही प्रमाणात आली तर २९२ (४७.२५%) लोकांना राहण्याची समस्या मोठ्या प्रमाणात आहे असे वाटते. १३० (१६.२५%) लोकांना राहण्याची समस्या नाही असे मत नोंदविले. यावरुन असे निदर्शनास येते की, चिखलदऱ्यामध्ये राहण्याची समस्या आहे याविषयी जाणून घेतले असता योग्य भावामध्ये खोल्या (Rooms) उपलब्ध होत नाही, पाहिजे तशा खोल्या (Rooms) मिळत नाही. वेळेवर खुप जास्त पैसे घेतात अशा प्रकारच्या प्रतिक्रिया पर्यटकांनी व्यक्त केल्या.

नास्ता व जेवणाच्या सुविधेविषयी जाणून घेतले असता काही प्रमाणात नास्ता व जेवणानी समस्या आहे असे अधिकांश म्हणजे ३२२ (४०.२५%) पर्यटकांना वाटते तर नास्ता व जेवणाची समस्या नाही असे २५५ (३१.८४%) पर्यटकांना वाटते. २२३ (२७.८७%) पर्यटकांना नास्ता व जेवणाची समस्या आहे असे वाटते.

यावरुन असे निदर्शनास येते की, अधिकांश लोकांना नास्ता व जेवणाच्या सुविधेविषयी काही प्रमाणात समस्या जाणवतात. याबाबत पर्यटकांकडून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना नास्ता व जेवण मिळत नाही उदा. इडली, दोसा, सांबार वडा, बटाटा वडा, मटन, फिश इत्यादी तसेच २२३ (२७.८७%) लोकांना नास्ता व जेवणाची समस्या आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांच्या मते नास्ता व जेवणाचे रेट खुप जास्त प्रमाणात आहे त्यामुळे भुक लागली तरी नास्त्यावर भागवावी लागते.

चिखलदरा येथील विविध पॉईंटवर भेटी देण्याकरिता व त्या पॉईंटची माहिती सांगण्याकरिता मार्गदर्शकाची गरज भासते. चिखलदरा येथे मार्गदर्शकाची अजिबात समस्या नाही अशी ६६३ (८२.८०%) पर्यटकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली त्यांच्या मते हे मार्गदर्शक अगदी ठरल्याप्रमाणे सर्व पॉईंटवर घेऊन जातात व त्या संदर्भातील सविस्तर माहिती देतात. ४५ (०५.७०%) पर्यटकांना मार्गदर्शकाची समस्या जाणवली त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता मार्गदर्शक योग्य माहिती देत नाही व दारु पिऊन असतात तसेच जास्त पैसे घेतात. अधिकांश मार्गदर्शक हे योग्य प्रकारे मार्गदर्शन करीत असल्यामुळे चिखलदरा येथे मार्गदर्शकाची समस्या नाही असे आपल्या लक्षात येते.

चिखलदरा येथे पर्यटन करीत असताना रस्त्याची / वाहतुकीची फार मोठी समस्या आहे असे ४१२ (५१.५०%) पर्यटकांना वाटते. रस्त्याची समस्या काही प्रमाणात आहे असे २७८ (३४.७५%) पर्यटकांना वाटते तर ११० (१३.७५%) पर्यटकांना रस्त्याची / वाहतुकीची समस्या नाही असे वाटते.

यावरुन असे निदर्शनास येते की, चिखलदरा येथे पर्यटनाकरिता गेले असता फार मोठ्या प्रमाणात रस्त्याची समस्या आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता पॉईंटवर जाण्याकरिता चांगले रस्ते नाही, रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडले आहे. मुख्य रस्ता देखील चांगला नाही तसेच परतवाड्यावरुन जाताना संपूर्ण घाटातील रस्ते खराब झालेले आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहे त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात अपघाताची शक्यता असते. ११० (१३.७५%) लोकांनी रस्त्याची / वाहतुकीची समस्या नाही असे नमुद केले. त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता ते दोन-तीन पॉईं[illegible] गेले त्यामुळे त्यांना रस्त्याची वाहतुकीची समस्या जाणवली नाही. चिखलदरा येथील पर्यटन स्थळी भेट दिल्यानंतर पैशाकरिता ए.टी.एम मध्ये गेले असता ए. टी. एम. मध्ये पैसच नव्हते त्यामुळे आमची गैरसोय झाली अशी प्रतिक्रिया अधिकांश ४०८ (५१.००%) पर्यटकांनी दिली. २४८ (३१.००%) पर्यटकांनी काही प्रमाणात ही समस्या जाणवली त्यांच्या मते ए. टी. एम. मधून नियमित पैसे निघत नाही, कधी कधी निघतात तर कधी कधी निघत नाही त्यामुळे काही प्रमाणात ही समस्या आहे असे त्यांना वाटते तर १४४ (१८.००%) पर्यटकांनी ए. टी. एम. किंवा बँकेची समस्या जाणवली नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

दवाखान्याच्या समस्येविषयी जाणून घेतले असता ३९७ (४९.६३%) पर्यटकांनी दवाखान्याची समस्या आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. २२४ (२८.००%) लोकांनी दवाखान्याची समस्या काही प्रमाणात आहे असे मत नोंदविले तर दवाखान्याची समस्या नाही असे १७९ (२२.३७%) लोकांना वाटते.

यावरुन असे निदर्शनास येते की, अधिकांश म्हणजे ३९७ (४९.६३%) लोकांना दवाखान्याची समस्या आहे अस वाटते त्यांच्या मते पर्यटनस्थळी दवाखान्याच्या चांगल्या सुविधा असावयास पाहजे ज्या इथे नाहीत. तसे काही प्रमाणात ज्यांना समस्या आहे असे वाटते त्यांच्या मते योग्य डॉक्टरांचा व औषधांचा अभाव असतो.

**सारांश व निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या तथ्य संकलनाच्या साधनाद्वारे जी माहिती अथवा तथ्य प्राप्त झालीत व त्याचे वर्गीकरण व विश्लेषण करुन जे निष्कर्ष प्राप्त झाले त्याचा सारांश पुढीलप्रमाणे

१. काही प्रमाणात राहण्याची समस्या आहे असे अधिकांश पर्यटकाला वाटते त्यामुळे पर्यटक हे काही प्रमाणात समाधानी आहेत.

२. नास्ता व जेवणाच्या सुविधाविषयी काही प्रमाणात समस्या आहेत त्यामुळे पर्यटक हे पूर्णपणे समाधानी होऊ शकत नाही.

३. पर्यटनाकरिता मार्गदर्शकाची समस्या नाही असे पर्यटकांना वाटते त्यामुळे अधिकांश पर्यटक हे समाधानी आहेत.

४. पॉईंटवर जाण्याकरिता रस्त्याची समस्या आहे त्यामुळे अधिकांश पर्यटक हे समाधानी नाही.

५. बँक / ए. टी. एम. ची मोठ्या प्रमाणात समस्या आहे असे अधिकांश पर्यटकांना वाटते.

६. दवाखान्याची समस्या आहे असे अधिकांश पर्यटकांना वाटते.

**सूचना :**

१. राहण्याच्या सुविधेविषयी सर्व हॉटेल्स युनियन तयार करुन खोल्या (Rooms) संदर्भात समान दरसूची (सुविधेनुसार) जाहीर करावी.

२. नास्ता व जेवणाचे दर सुध्दा सर्व रेस्टॉरेंटमध्ये समान असावेत. तसेच काही आवश्यक पदार्थ पर्यटकांना देण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

३. पॉईंटवर जाण्याकरिता रस्ते चांगले असावेत याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधित विभागानी योग्य काळजी घ्यावी जेणेकरुन पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत होईल.

४. चिखलदरा हे पर्यटन स्थळ असल्यामुळे उपलब्ध बँकेनी ए. टी. एम. मध्ये नियमित पैसा ठेवावा.

५. चिखलदरा हे पर्यटन स्थळ असल्यामुळे संपूर्ण राज्य व देशामधून पर्यटक येत असतात त्यामुळे चिखलदरा येथे जिल्हा ग्रामीण रुग्णालयाची सुविधाजनक व्यवस्था असावी.

**संदर्भग्रंथ सूची :**


- फडणवीस, मृणालिनी. विदर्भ पर्यटन सुवर्ण आशा. नागपूर : श्री रेणूका प्रकाशन.
- बांगला रिचा (भाप्रसे) जिल्हाधिकारी अमरावती (संपा.) स्मरणिका. चिखलदरा पर्यटन महोत्सव २०१०-११
- http://len.wikipedia.org.socialdevelopmenttheory
- www.touristlink.com/India/vidharbha
- www.touristlink.com/India/Amravati
- wikitraval.org.len/Nagpur
- wikipedia.org/wiki/vidharbha


□□□

Dr. Anand V. Dudul

Arts, Science & Commerce College, Chikhaldara.

**20**

# महाराष्ट्रात प्रधानमंत्री मुद्रा योजना —एक अध्ययन


डॉ. प्रकाश बाबुराव तितरे

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख,

विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती जि. चंद्रपूर


***********


**गोषवारा:**

प्रधानमंत्री मुद्रा योजना ही भारतातील आर्थिक समावेशक प्रोत्साहन देणारी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेतंर्गत ५०,००० हजार रूपयांपासून १० लाखांपर्यंत कर्ज घेऊन आपला व्यवसाय सुरू करता येतो. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे उद्योजकांना आणि छोटया व्यावसायिकांना त्यांची क्षमता व कार्यप्रणाली वाढविण्यासाठी प्रोत्साहित करणे, अर्थव्यवस्थेत पतपुरवठा करण्याकरीता औपचारिक व्यवस्था पुरविणे, लघु व कुटीर उद्योजकांची भरभराट करणे, रोजगार निर्मिती करणे व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ कारणे हे आहे. महाराष्ट्रातील पीएमएमवाय योजनेची संधी, त्या योजनेचे फायदे आणि कामगिरी यांचा अभ्यास या संशोधन लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.



**बिजशब्द :** मुद्रा योजना, वित्त, पीएमएमवाय, एजन्सी, अर्थसंकल्प


**प्रस्तावना :**

केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी २०१५–१६ च्या अर्थसंकल्पात लहान उद्योजकांकरीता पतपुरवठयाची सोय व्हावी म्हणून एखादी बँक असावी असे प्रस्तावित केले होते. या अनुषंगाने लघु उद्योगांना किंवा व्यवसायिकांना कर्ज पुरवठा व्हावा या उद्देशाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ राजी 'मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी' (MUDRA YOJANA) देशात सुरू केली. सरकारने या योजनेकरीता २० हजार कोटींची तरतूद केली होती. प्रधानमंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाई) एक गैर—कॉर्पोरेट,